

# स्वच्छ दूधनिर्मिती व दुधाळ जनावरांच्या आहारामध्ये बायपास फॅट मिश्रणाचे महत्त्व

**डॉ. संजयकुमार विठ्ठलराव उद्धरवार,**
विषय तज्ज्ञ ( पशुविज्ञान) कृषी विज्ञान केंद्र (उत्तर गोवा),
**डॉ. चेतनकुमार एच. बी.,**
सायंटिस्ट (पशुविज्ञान),
**डॉ. एकनाथ चाकूरकर,**
प्रभारी संचालक व प्रिन्सिपल सायंटिस्ट (पशुविज्ञान),
आयसीएआर- सीसीएआरआय, जुने गोवे, गोवा ४०३४०२.

**स्वच्छ दूधनिर्मितीसाठी उपाय आणि बायपास फ्याट म्हणजे काय, त्याची तयारी व देण्याची योग्य वेळ, प्रमाण आणि खाऊ घालण्याच्या पद्धती यासंबंधी माहितीचा समावेश या लेखात केला आहे.**

आपल्या देशात जास्त करून गायी, म्हशीचे दूध वापरले जाते. दुधांला पूर्ण अन्न असे म्हटले जाते. दुधाचे मानवी आहारात महत्त्वाचे स्थान आहे . त्यासाठी प्रत्येक व्यक्तीचे आरोग्य व्यवस्थित राहण्यासाठी स्वच्छ दूध मिळणे गरजेचे आहे.

## स्वच्छ दूध

स्वच्छ दूध म्हणजे असे दूध जे निरोगी जनावरांपासून काढलेले, दुर्गंधी किंवा कुठल्याही प्रकारची घाण नसलेले आणि सूक्ष्म जंतूंचे प्रमाण कमीत कमी असलेले दूध होय.

## स्वच्छ दूधनिर्मितीसाठी उपाय व शेतकऱ्यांनी घ्यावयाची काळजी

स्वच्छ दूधनिर्मितीसाठी तसेच दुग्धव्यवसाय फायदेशीर राहण्यासाठी त्रिसूत्री स्वच्छतेची अत्यंत गरज आहे. त्यामध्ये दूध काढणारी व्यक्ती, दुधाळ जनावरे, तसेच सभोवतालचे वातावरण (गोठा व गोठ्यातील नियोजन) या तीन गोष्टी सदैव स्वच्छ असल्या पाहिजेत.

## दूध काढणारी व्यक्ती

सदैव स्वच्छ असावा. त्याने स्वतःची व कपड्याची स्वच्छता ठेवावी. हाताची नखे कापलेली असावीत. धारा काढतेवेळी धूम्रपान करू नये, तंबाखू खाऊ नये. कारण या व्यसनामुळे दुधास वास लागतो, तसेच दूध काढत असताना दुधाच्या पात्राच्या दिशेने खोकलू किंवा शिंकू नये. ती व्यक्ती निरोगी असावी. त्याला क्षय, खरुजासारखे आजार असू नये, तसेच हातावर जखमा असू नयेत. दूध काढण्यापूर्वी तो आपले हात